# भारत टॅलेंट सर्च परीक्षा सन २०२६

इयत्ता : ३ री | माध्यम : मराठी व सेमी इंग्रजी | एकूण प्रश्न : ७५

वेळ : २ तास | **विषय : भाषा, गणित, परिसर अभ्यास व तार्किक विचार** | एकूण गुण : १५०

## विभाग अ

प्र.१ 'सामील होणे' यासाठी दुसरा पर्यायी शब्द कोणता ?

1) मिसळविणे 2) मिसळणे 3) भागीदार 4) सहभागी होणे

प्र.२ जसे – पैसे : बँक :: ? : पोलीस स्टेशन

1) फुले 2) मुले 3) आरोपी 4) डॉक्टर

प्र.३ वैद्यकीय उपचार करणारा

1) शिक्षक 2) परिचारिका 3) वकील 4) डॉक्टर

प्र.४ अक्षर जुळवून अर्थपूर्ण शब्द बनव.

क शा ग्नि अ म

1) अग्निनाशक 2) अग्निशामक 3) अग्निशामन 4) शामनअग्नि

प्र.५ साधनाकडे लाल, गुलाबी, हिरव्या आणि पिवळ्या रंगाच्या सुंदर, काचेच्या बांगड्या आहेत.वरील वाक्यात किती विशेषणे आहेत ?

1) सहा 2) पाच 3) चार 4) दोन

प्र.६ १ आठवडा : ७ दिवस :: १ वर्ष : ?

1) ३६४ दिवस 2) ५२ आठवडे 3) १२ महिने 4) ३६६ दिवस

1 Week : 7 Days :: 1 Year : ?

1) 364 Days 2)52 Weeks 3) 12 Months 4) 366 Days

प्र.७ शिक्षकदिन कोणत्या महिन्यात असतो ?

1) ऑगस्ट 2) ऑक्टोबर 3) जानेवारी 4) सप्टेंबर

In which month is Teachers' Day celebrated?

1) August 2) October 3) January 4) September

प्र.८ प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या निवडा:

२, २, ४, १२, ४८, ?

1) १९२ २) २४० ३) १३६ ४) २०८

Select the correct number to replace the question mark:2, 2, 4, 12, 48, ?

1) 192 2) 240 3) 136 4) 208

प्र.९ २ दिवस : ............... तास ?

1) २४ 2) ३६ 3) ४८ 4) ७२

2 Days : ? Hours

1) 24 2) 36 3) 48 4) 72

प्र.१० आग लागली असता आग विझविण्यासाठी कोण मदतीला येते ?

1) डॉक्टर 2) पोलिस 3) अग्निशमन केंद्र 4) सैनिक

प्र.११ चुकीची जोडी ओळख.

1) सूर्यमाळ – छत्रपती संभाजीनगर 2) माथेरान – रायगड

3) येडशी – यवतमाळ 4) पन्हाळा – कोल्हापूर

प्र.१२ कुत्रा चावल्यास मोफत लस कोठे दिली जाते ?

1) शासकीय दवाखाना 2) खाजगी दवाखान्यांत 3) निमशासकीय 4) यापैकी नाही

प्र.१३ महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेली ..........आणि ......... ही दोन पोलीस आयुक्तालय आहेत.

1) पिंपरी चिंचवड, तळेगाव ढमढेरे 2) अहिल्यानगर, धाराशिव

3) पिंपरी चिंचवड, वसई विरार 4) वसई विरार, अंबरनाथ

प्र.१४ ४, ९, १४, १९, २४, ?

1) २८ 2) २६ 3) २७ 4) २९

Complete the series: 4, 9, 14, 19, 24, ...?

1) 28 2) 26 3) 27 4) 29

प्र.१५ लाडूपेक्षा बासुंदी गोड आहे. जिलेबी बासुंदीपेक्षा गोड आहे, तर सर्वांत गोड पदार्थ कोणता ?

1) बासुंदी 2) जिलेबी 3) लाडू 4) यापैकी नाही

## विभाग ब

प्र. १६ व १७ साठी सूचना – कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नाच्या उत्तराचा अचूक पर्याय रंगव.

जंगलात जमले प्राणी,
म्हणू लागले गाणी.
सिंह झाला राजा,
कुत्र्याने वाजवला बाजा.
वाघ आला पळत,
मांजर आली खेळत.
गाय आली हळू,
ससा लागला पळू.
जंगलात बसली पंगत,
छान झाली संगत.

– ज्ञानदेव नवसरे

प्र.१६ 'सावकाश' या शब्दाचा समानार्थी शब्द शोध.

1) जोरात 2) अवकाश 3) वेगात 4) हळू

प्र.१७ प्राण्यांची पंगत कोठे बसली आहे ?

1) जंगलात 2) घरात 3) दारात 4) जंगलाबाहेर

प्र.१८ खालील शब्दांतून अनेकवचनी शब्दाचा पर्याय क्रमांक शोध.

1) गोळा 2) शाळा 3) टाळा 4) मळा

प्र.१९ खालीलपैकी पाळीव नसलेला प्राणी ओळख.

1) वाघ 2) गाय 3) मांजर 4) कुत्रा

प्र.२० खालील शब्दातील समानार्थी नसलेला शब्द पर्यायातून निवड.

1) शशांक 2) सविता 3) सुधांशू 4) रजनीनाथ

प्र.२१ २, ९, ८, ० या अंकाचा प्रत्येकी एकदाच वापर करून तयार होणारी चार अंकी लहानात लहान संख्या तयार कर.

१) ०२९८ २) ९८२० ३) २०८९ ४) २८९०

Make the smallest four-digit number using the digits 2, 9, 8, 0 only once.

1) 0298 2) 9820 3) 2089 4) 2890

प्र.२२ 'सात हजार अडूसष्ट' ही संख्या अंकात लिही.

१) ७०००६८  २) ७६८  ३) ७०६८  ४) ७००६८

Write the number in figures: "Seven thousand sixty-eight"

1) 700068  2) 768  3) 7068  4) 70068

प्र.२३ त्रिकोणाच्या कोनांची संख्या आयताच्या कोनांच्या संख्येपेक्षा कितीने कमी अथवा जास्त आहे ?

१) १ ने जास्त  २) २ ने जास्त  ३) १ ने कमी  ४) २ ने कमी

What is the difference between the number of angles in a triangle and a rectangle?

1) More by 1  2) More by 2  3) Less by 1  4) Less by 2

प्र.२४ माध्यान्हपूर्व पावणे अकरा वाजता सुरू झालेला क्रिकेटचा सामना दुपारनंतर अडीच वाजता संपला. तर तो सामना किती वेळ चालला ?

1) अडीच तास  2) पावणेचार तास  3) पावणेतीन तास  4) साडेतीन तास

A cricket match started at quarter to eleven in the morning and ended at half-past two in the afternoon. How long did the match last?

1) Two and a half hours  2) Quarter to four hours (3 hours 45 min)
3) Quarter to three hours  4) Three and a half hours

प्र.२५ तीन अंकी लहानात लहान संख्या खालील पर्यायातून निवड.

1) १०१  2) ९९८  3) १००  4) २४५

Select the smallest three-digit number from the options.

1) 101  2) 998  3) 100  4) 245

प्र.२६ 'आंबा गोड आहे' हे पर्यायातील कोणत्या अवयवाने ओळखशील ?

1) नाकाने  2) जीभेने  3) त्वचेने  4) पर्याय १ व २ बरोबर

प्र. २७ मानेच्या पुढील भागास काय म्हणतात ?

1) तोंड  2) हनुवटी  3) मान  4) गळा

प्र. २८ साप : गांडूळ :: बेडूक : ?

1) कासव  2) कावळा  3) गाय  4) वाघ

प्र.२९ एका रांगेत 'अ' डावीकडून १५ व्या क्रमांकावर आहे आणि 'ब' उजवीकडून २० व्या क्रमांकावर आहे. जर त्यांनी आपापल्या जागांची अदलाबदल केली, तर 'अ' डावीकडून २५ व्या क्रमांकावर येतो. तर त्या रांगेत एकूण किती मुले आहेत?

1) ४३  2) ४४  3) ४५  4) ३५

In a row, 'A' is 15th from the left and 'B' is 20th from the right. If they swap places, 'A' becomes 25th from the left. Than, How many children are in the row?

1) 43  2) 44  3) 45  4) 35

प्र.३० एका सांकेतिक भाषेत राम हा शब्द ३९ असा लिहितात तर संत्री हा शब्द ५६ असा लिहितात तर रात्री शब्द कसा लिहाल ?

1) ३४  2) ४६  3) ३६  4) ३५

## विभाग क

प्र.३१ पोटात .......... ओरडणे.

1) पोपट  2) चिमणी  3) कावळे  4) साप

प्र.३२ 'दिनकर' या शब्दातून कोणता शब्द तयार होईल?

1) दीन  2) दीर  3) कण  4) दिन

प्र.३३ 'क ले कों झा डे चे तां म्ह ब फु न ह ही ना य रा त टा णू ब डे' या अक्षरांत दडलेल्या म्हणीचा अर्थ ओळख.

1) गरजू माणसास प्रसंगी मनाविरुद्ध गोष्टसुद्धा मान्य करावी लागते.

2) निश्चित घडणारी घटना. कोणाच्याही प्रयत्नाने टाळता येत नाही.

3) प्रत्येकाला आयुष्यात कधी ना कधी अधिकार गाजवण्याची संधी मिळतेच

4) कोणत्याही भांडणात, भांडणाऱ्या दोन्ही बाजूंकडील माणसे जबाबदार असतात.

प्र.३४ खालील शब्द वर्णानुक्रमे लावले असता शेवटून दुसरा कोणता शब्द येईल?

1) कारले 2) टोमॅटो 3) गाजर 4) कोबी

प्र.३५

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ज | म | ला | ण | र | ज |
| रे | त्या | रो | डे | को | |

वरील अक्षरांपासून कोणती म्हण तयार होईल?

1) रोज रडे त्याला कोण मार 2) रोज मारे त्याला कोण रडे

3) रोज मरे त्याला कोण रडे 4) यापैकी नाही

प्र.३६ ३८० ÷ ४ = ?

1) ९५ 2) ८५ 3) २५ 4) ९४

380 ÷ 4 =?

1) 95 2) 85 3) 25 4) 94

प्र.३७ साडेतीनशे + सव्वाशे = किती ?

1) पावणेचारशे 2) साडेचारशे 3) पावणेपाचशे 4) सहाशे

Three hundred and fifty + One hundred and twenty-five = How much?

1) Three hundred and seventy-five 2) Four hundred and fifty

3) Four hundred and seventy-five 4) Six hundred

प्र.३८ १ ते १०० मध्ये कोणता अंक २० वेळा येत नाही?

1) १ 2) २ 3) ३ 4) ५

From 1 to 100, which digit does not appear 20 times?

1) 1 2) 2 3) 3 4) 5

प्र.३९ एका मिठाईच्या कारखान्यात एकूण ४५६० लाडू तयार झाले. जर हे लाडू प्रत्येकी २४ च्या एका बॉक्समध्ये भरले, तर काही बॉक्स लागतात. परंतु, जर बॉक्सची क्षमता वाढवून प्रत्येकी ३० लाडूंची केली, तर आधीपेक्षा किती बॉक्स कमी लागतील?

1) १९० 2) ३८ 3) ४८ 4) १५२

A sweet factory made 4560 Laddus. If filled in boxes of 24 each , some boxes are needed. If the box capacity is increased to 30 Laddus each, how many fewer boxes will be needed?

1) 190 2) 38 3) 48 4) 152

प्र.४० खालीलपैकी चुकीचे विधान ओळख.

1) कडूलिंब कडू असतो. 2) गूळ गोड असतो. 3) आईस्क्रिम खारट असते. 4) आवळा तुरट असतो.

प्र.४१ वनस्पतींच्या पानामध्ये कोणता घटक असतो ?

1) शेवाळ 2) हरितद्रव्य 3) बुरशी 4) यापैकी नाही.

प्र.४२ आरोग्य चांगले राहण्यासाठी खालीलपैकी कोणता पदार्थ खाणार ?

1) चॉकलेट 2) बर्गर 3) पिझ्झा 4) भाजी भाकरी

प्र.४३ जुन्या कपड्यांपासून कोणत्या वस्तु बनवतात ?

1) शोभेच्या वस्तु 2) खेळणी 3) पायपुसणी 4) पर्याय १, २ व ३

प्र.४४ प्रणवपेक्षा सीता ५ वर्षांनी लहान आहे. ५ वर्षांपूर्वी प्रणवचे वय २१ वर्षे होते. तर आणखी सात वर्षांनी प्रणव आणि सीता यांच्या वयांतील फरक किती येईल.?

1) १५ 2) ९२ 3) ५ 4) २६

Sita is 5 years younger than Pranav. 5 years ago, Pranav was 21 years old. What will be the difference between their ages after 7 years?

1) 15 2) 92 3) 5 4) 26

प्र.४५ आई आणि मुलगी यांच्या आजच्या वयांची बेरीज ५० वर्षे आहे. ५ वर्षांपूर्वी आईचे वय मुलीच्या वयाच्या ४ पट होते, तर मुलीचे आजचे वय किती?

1) १० 2) १३ 3) १५ 4) ८

The sum of a mother and daughter's current age is 50 years. 5 years ago, the mother's age was 4 times the daughter's age. What is the daughter's current age?

1) 10 2) 13 3) 15 4) 8

## विभाग ड

प्र.४६ खालीलपैकी वाक्यातील अधोरेखीत शब्दाची जात ओळख.

<u>मेट्रोचा</u> प्रवास आरामदायी असतो.

1) नाम 2) सर्वनाम 3) विशेषण 4) क्रियापद

प्र.४७ करवंदाची –

1) जाळी 2) मोळी 3) टोळी 4) रांग

प्र.४८ सूचना – खालील शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय शोध.

कुरूप

1) क्लिन 2) सुंदर 3) देखणी 4) उत्तम

प्र.४९ पाऊस पडला की संपूर्ण परिसर ............ होतो.

1) जलमय 2) कोरडा 3) उष्ण 4) दमट

प्र.५० एक रुपयाच्या दोन चॉकलेट येत असतील तर दहा रुपयांत किती चॉकलेट येतील?

1) १० 2) २० 3) ५ 4) १५

If two chocolates cost 1 Rupee, how many chocolates will you get for 10 Rupees?

1) 10 2) 20 3) 5 4) 15

प्र.५१ रामला १० लीटर पाणी आणायचे आहे तर तो कोणता पाण्याचा ड्रम घेऊन जाईल ?

1) पाच लिटरचा ड्रम 2) सात लिटरचा ड्रम 3) पंधरा लिटरचा ड्रम 4) नऊ लिटरचा ड्रम

Ram wants to bring 10 Liters of water. Which drum should he take?

1) 5 Liter drum 2) 7 Liter drum 3) 15 Liter drum 4) 9 Liter drum

प्र.५२ १ क्विंटल धान्यात दीड किलोग्रॅम धान्य खराब निघाले. तर चांगले धान्य किती ?

1) ९७५ कि.ग्रॅ. 2) ९८.५ कि.ग्रॅ. 3) ९९.५ कि.ग्रॅ. 4) ९८ कि.ग्रॅ.

In 1 Quintal of grain, 1.5 kg was spoiled. How much good grain remains?

1) 97.5 kg 2) 98.5 kg 3) 99.5 kg 4) 98 kg

प्र.५३ ५० रुपयांच्या नोटांच्या एका बंडलमध्ये अनुक्रमांक ४२३१५ पासून ४२३६४ पर्यंतच्या नोटा आहेत. तर त्या बंडलमध्ये एकूण किती रक्कम आहे?

1) २४५० रुपये 2) २५०० रुपये 3) २४०० रुपये 4) २५५० रुपये

A bundle of 50 Rupee notes has serial numbers from 42315 to 42364. What is the total amount in the bundle?

1) 2450 Rupees 2) 2500 Rupees 3) 2400 Rupees 4) 2550 Rupees

प्र.५४ १ ते १०० मध्ये किती विषम संख्या असतील?

1) १०० 2) २५ 3) १५ 4) ५०

How many odd numbers are there from 1 to 100?

1) 100 2) 25 3) 15 4) 50

प्र.५५ खालीलपैकी एक वृत्तपत्राचे नाव नाही?

1) महाराष्ट्र टाईम्स 2) सकाळ 3) लोकमत 4) गंमत-जंमत

प्र.५६ खालीलपैकी कोणत्या संदेशवहन साधनाचा वापर करून आपण एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्क साधू शकतो, पण ज्यामध्ये आपण समोरच्या व्यक्तीचा चेहरा पाहू शकत नाही?

१) मोबाईल फोन (व्हिडिओ कॉल) २) दूरचित्रवाणी (Television)

३) आकाशवाणी (Radio) ४) कृत्रिम उपग्रह (Artificial Satellite )

प्र.५७ बंडूचे डोळे दुखत आहेत तर बंडूने खालीलपैकी काय केले पाहिजे ?

1) मोबाईल बघितला पाहिजे. 2) टीव्ही. बघितला पाहिजे.

3) संगणकावर गेम खेळला पाहिजे. 4) मोबाईल, टिव्ही, संगणकाचा वापर कमी केला पाहिजे.

प्र.५८ मानवाला एका जागी घरे बांधून 'गाव' तयार करून राहण्याची गरज प्रामुख्याने कोणत्या गोष्टीमुळे निर्माण झाली?

1) चाकाचा शोध लागल्यामुळे 2) आगीचा उपयोग समजल्यामुळे

3) शेतीचा शोध लागल्यामुळे 4) शिकारीसाठी सोपे जावे म्हणून

प्र.५९ अक्षरमाला - ABCDE FGHIJ KLMNO PQRST UVWXY

अक्षरमालेत M अक्षराच्या डावीकडून जो क्रमांक आहे, तोच क्रमांक उजवीकडून असणारे अक्षर कोणते ?

1) F 2) G 3) E 4) M

In the alphabet series if we count from the left there is a number of alphabet M. which alphabet will have the same number if we count from the right?

1) F 2) G 3) E 4) M

प्र.६० डावीकडून १५ वे अक्षर कोणते ?

1) L 2) M 3) O 4) K

Which alphabet is 15 from the left?

1) L 2) M 3) O 4) K

## विभाग इ

चुंबकसूची वापरून दिशा ओळखण्यासाठी बनवलेल्या उपकरणास 'होकायंत्र' म्हणतात. चुंबकसूची ही नेहमी दक्षिण उत्तर दिशेत स्थिर असते. या गुणधर्माचा उपयोग होकायंत्रात करतात. विमान चालवताना दिशा समजण्यासाठी वैमानिक, समुद्र प्रवास करताना खलाशी, वाळवंट व जंगलात प्रवास करताना प्रवाशी व सैनिक याचा वापर करतात.

**प्रश्न ६१ ते ६२ – वरील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिही.**

प्र.६१ 'चुंबकसूची वापरून दिशा ओळखतात' या वाक्यातील क्रियापद ओळख.

1) चुंबकसूची 2) दिशा 3) ओळखतात 4) वापरून

प्र.६२ होकायंत्रात चुंबकसूची स्थिर राहणाऱ्या दिशा........

1) पूर्व-पश्चिम 2) दक्षिण-उत्तर 3) पूर्व-उत्तर 4) पश्चिम-उत्तर

प्र.६३ निश्चित ठिकाणी जाण्यासाठी मोबाईलमधील कोणत्या ॲपचा वापर करतात ?

1) क्रोम 2) गुगल मॅप 3) फोन पे 4) कॅमेरा

प्र.६४ 'सुजय आणि संदीप यांची वाटेत भेट झाली, तेव्हा संदीप ने सुजयला लाल पेन भेट म्हणून दिला.'
या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा अर्थ पर्यायातून शोध.


1) मदत 2) भेटणे 3) नजराणा 4) भावना

प्र.६५ पुढील पर्यायातील घरदर्शक शब्दांच्या एकूण किती जोड्या योग्य आहेत ?

(अ) सुगरण – खोपा (ब) घोडा – तबेला (क) मधमाशा – पोळे (ड) सिंह – ढोली

1) दोन 2) एक 3) तीन 4) सर्व योग्य

प्र.६६ संतोषला रोहन पर्यंत जाण्यासाठी किती वेळा वळावे लागेल ?




1) १० 2) ८
3) ९ 4) ७

How many times does Santosh have to turn to reach Rohan? (Based on the visual path)

1) 10 2) 8
3) 9 4) 7

प्र.६७ ३ ✻ ५
x ७
२७६५ तर ✻ = ?

1) ८ 2) ७ 3) ६ 4) ९

3 * 5
× 7
----------------
2765 Than * = ?

1) 8 2) 7 3) 6 4) 9

प्र.६८

| | |
|---|---|
| ७ | |
| ८ | ५६ |

| | |
|---|---|
| ९ | |
| ६ | ५४ |

| | |
|---|---|
| १३ | |
| ८ | ? |

| | |
|---|---|
| १२ | |
| ४ | ४८ |

1) २१ 2) १०० 3) ९१ 4) १०४

| | |
|---|---|
| 7 | |
| 8 | 56 |

| | |
|---|---|
| 9 | |
| 6 | 54 |

| | |
|---|---|
| 13 | |
| 8 | ? |

| | |
|---|---|
| 12 | |
| 4 | 48 |

1) 21 2) 100 3) 91 4) 104

प्र.६९ वर्गातील फळ्यावर शिक्षकांनी एक 'चौरस' काढला आणि एक 'आयत' काढला. मुलांनी या दोन्ही आकृत्यांच्या सममिती रेषा मोजल्या. तर चौरसाच्या सममिती रेषा, आयताच्या सममिती रेषांपेक्षा कितीने जास्त आहेत?

1) १ ने 2) ४ ने 3) २ ने 4) सारख्याच आहेत

The teacher drew a 'Square' and a 'Rectangle' on the board. The children counted the Lines of Symmetry. By how much are the square's lines of symmetry more than the rectangle's?

1) By 1 2) By 4 3) By 2 4) They are the same

प्र.७० ईश्वरीकडे १२ डझन केळी आहेत, त्यातील तिने पाव डझन जॉनला, अर्धा डझन अक्षरला व ४८ केळी हिनाला दिल्या तर कोणाला जास्त केळी मिळतील?

1) जॉनला 2) हिनाला 3) अक्षराला 4) ईश्वरीला

Ishwari has 12 dozen bananas. She gave a quarter dozen to John, half a dozen to Akshara, and 48 bananas to Hina. Who will get the most bananas?

1) John 2) Hina 3) Akshara 4) Ishwari

प्र.७१ मणभर चर्चेपेक्षा कणभर आचरण श्रेष्ठ आहे.

1) महात्मा गांधी 2) समर्थ रामदास 3) पंडित नेहरु 4) विनोबा भावे

प्र.७२ शून्य सावली दिवस, वर्षातून किती वेळा येतो ?

1) १ 2) २ 3) ३ 4) ४

प्र.७३ सकाळच्या सूर्यप्रकाशातून आपणास कोणते जीवनसत्त्व मिळते ?

1) A 2) B 3) C 4) D

प्र.७४ राधा आपल्या घरापासून ५ किमी उत्तरेकडे चालत गेली. तिथे ती उजवीकडे वळली आणि ३ किमी चालली. पुन्हा उजवीकडे वळून ती ५ किमी चालली. शेवटी ती डावीकडे वळली आणि २ किमी चालली. तर आता ती आपल्या घरापासून कोणत्या दिशेला आणि किती अंतरावर आहे ?

1) ५ किमी, पूर्व 2) ५ किमी, पश्चिम 3) ३ किमी, उत्तर 4) १० किमी, दक्षिण

प्र.७५ घरी वडील आजारी असताना पूर्वाने काय करावे ?

1) टी.व्ही. पाहावा 2) वडिलांची सेवा करावी. 3) खेळायला जाणे. 4) खाऊसाठी पैसे मागावेत.

-------